भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. २५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०५/२०१८

**१) संगनमत करुन दगडाने डोक्यावर मारुन जखमी केले व गाडीचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०५/२०१८ चे २३.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे ओमनी गाडी क्र. एमएच ३१ सी एस ०१५७ गाडी मध्ये मित्रांचे फॅमीलीसह मोहाडी वरुन तुमसर कडे येत असतांना दोन १८ ते २५ वयोगटातील अज्ञात आरोपीतांनी संगनमत करुन तु आमचे मित्र कलाम यास ठोस मारली या कारणा वरुन फिर्यादीचे ओमनी गाडी समोर मोटार सायकल उभी करुन रस्ता अडविला व दगडाने फिर्यादीचे डोक्याला मारुन जखमी केले व गाडीचे नुकसान केल्याने फिर्यादी दिलीप नानाजी नवरखेडे वय ४० वर्ष रा. नेहरु नगर तुमसर यांचे बयाना वरुन व डॉ. एमएलसी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३४१,३२४,४२७,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मल्होत्रा पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ व मारपीट करुन मारण्याची धमकी देवुन अपमानीत केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १०/०५/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे २ मित्रा सोबत निलज येथील चंदु धाब्यावर जेवन करण्या करीता गेला व ढाबा मालक व आरोपी यांना चिकन ओरीजनल आहे का असे विचारले असता आरोपी याने तु कोण आहेस खायचे असेल तर खा! असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ व मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिली तसेच आरोपी क्र. १ व इतर यांनी फिर्यादीचे डोक्यावर स्प्रे मारुन विडीओ काढुन त्या विडीओची क्लीप व्हॉट्अप वर वायरल केल्याने फिर्यादीचा अपमान झाल्याने फिर्यादी गुणवंत शंकर लांजेवार वय ३४ वर्ष, रा. शनीवारी वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ६७(अ)आयटी ॲक्ट २००० सहकलम २९४,५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मल्होत्रा पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १४/०५/२०१८ चे २३.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी हा अंधारात आपले अस्तीत्व लपवुन संशया–स्पद रित्या कोणीतरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. गदादे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक १३/०५/२०१८ चे १२.५० वाजता दरम्यान यातील मृतक मधुकर आत्माराम बडवाईक वय ४५ वर्ष, रा. वडद हा दिनांक १३/०५/२०१८ ला ओपी पॉयझनींग प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना मारबते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १४/०५/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅजीक वाहन पलाडी फाटा येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या –जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका व वाहतुकीस अडथळा निर्माण करुनबंद स्थितीत मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. सेलोकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १३/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०५ तीन सिटर वाहनाकरीता– १२ ईतर वाहनांवरती – ११३ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.